राज्यातील सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी प्रसिध्द केलेल्या सन २०२४ ते २०२६ या कालावधीच्या लेखापरीक्षक नामतालिकेस मुदतवाढ देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**क्रमांक सगृयो-२०२६/प्र.क्र.२५/१४-स**
नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**दिनांक :- ०१.०४.२०२६**

वाचा :-

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८१ व १९६१ चे नियम ६९.
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शा.नि. क्र.सगृयो-२०१३/३८९/ प्र.क्र.५५/१४-स,दि.२०.०१.२०१७.
३) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग शा.नि.क्र.सगृयो-२०१७/प्र.क्र.२६०/१४-स, दि.२७.०२.२०१८
४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शा.नि.क्र.सगृयो-२०२४/प्र.क्र.२०/१४-स, दि.०७.०२.२०२४
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क. सआ-२०/ लेप/नामतालिका २०२६-२८/ मुदतवाढ २०२४-२६/२९२/ सन २०२६,दि.१६.०२.२०२६

राज्यातील सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी सन २०२४ ते २०२६ या कालावधीकरिता अर्हताधारक राज्यस्तरीय लेखापरीक्षकांची नामतालिका या विभागाच्या संदर्भाधीन दि.०७.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर नामतालिकेची मुदत दि.३१ मार्च २०२६ अखेर संपुष्टात येत असून, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सादर केलेल्या दि.१६.०२.२०२६ च्या प्रस्तावानुसार, पुढील कालावधीसाठी लेखापरिक्षकांची नवीन नामतालिका तयार करुन प्रसिध्द करण्याच्या कार्यवाहीस तांत्रिक व प्रशासकीय कारणास्तव अदयाप ६ महिन्याचा कालावधी लागणार असल्याचे कळविण्यात आले आहे. यास्तव राज्यस्तरीय लेखापरीक्षकांच्या सदय:स्थितीत अस्तित्वात असलेल्या नामतालिकेस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे कलम ६९ अन्वये, सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करण्याकरिता दि.०७ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या सन २०२४-२६ या कालावधीच्या अर्हताधारक राज्यस्तरीय लेखापरिक्षकांच्या नामतालिकेस पुढील ६ महिन्यांच्या कालावधीसाठी म्हणजेच दि.३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४०११४३६२१५९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SHILPA JEETENDRA PURAO
Date: 2026.04.01 14:37:37 +05'30'

(शिल्पा पुरव)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा .राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष/ मा.सभापती, महाराष्ट्र विधानमंडळ यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा/ विधानपरिषद), महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
६. मा. विधीमंडळ सदस्य (सर्व)
७. अ.मु.स./मा.प्रधान सचिव/मा.सचिव (सर्व विभाग), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
८. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, मंत्रालय, मुंबई
९. संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. आयुक्त, वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१२. संचालक, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१३. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
१४. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
१५. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
१६. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१९. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण).
२०. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
२१. सर्व जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था,
२२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२३. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, (सर्व कार्यासने),मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२४. अध्यक्ष, मुंबई जिल्हा को.ऑप.हौसिंग फेडरेशन लि.,मुंबई
२५. निवड नस्ती / (१४-स).